# दृष्टिदान महत्त्वाचे : पोंक्षे

**पुणे :** 'आपल्याकडे ज्या गोष्टी असतात, त्याचे आपल्याला महत्त्व वाटत नाही. पण दृष्टिहिनांचे जीवन जवळून अनुभवले की आपल्याजवळील अमूल्य गोष्टींची जाणीव होते. त्यामुळेच दृष्टीदान महत्वाचे दान आहे,' असे मत अभिनेते शरद पोंक्षे यांनी व्यक्त केले.

कॉन्टिनेन्टल प्रकाशित व डॉ. जाई केळकर लिखित 'आय केअर फॉर किडस्' पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मीना चंदावरकर, राष्ट्रीय नेत्रचिकित्सा संस्थेचे संस्थापक डॉ. श्रीकांत केळकर, अरुणा केळकर, डॉ. आदित्य केळकर, उद्योजक प्रतापराव पवार, लेखिका डॉ. जाई केळकर, कॉन्टिनेन्टलच्या देवयानी कुलकर्णी-अभ्यंकर उपस्थित होत्या. 'बुकगंगा'च्या वतीने पुस्तकाच्या ई-बुकचे प्रकाशन झाले.

पवार, चंदावरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक, तर सूत्रसंचालन राजेश दामले यांनी केले. पोंक्षे यांच्या नाट्यचित्रपट सृष्टीतील कारकिर्दीवर आधारित 'नथुराम ते देवराम' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.